मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# परिसरातील इमारतीवर बेकायदा केबल नेटवर्कचे जाळे; अपघात वाढण्याची शक्यता

## सुरक्षेच्या दृष्टीने कोणतेही नियम नसल्याने परिस्थिती कठीण

**मनीषा थोरात पिसाळ**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
प्राधिकरण परिसरातील इमारतींवर, स्पाईन सिटी मॉल याठिकाणी टीव्ही, केबल, इंटरनेटचे जाळे पसरल्याचे चित्र पहायला मिळत आहे. सर्व वायक एकमेकांमध्ये गुंतल्या जाऊन जाळे तयार झाले आहे. विशेष म्हणजे या बेकायदा नेटवर्क जाळ्यावर कोणाचेही नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. केबलच्या गुंत्यामुळे लहान-मोठे अपघात होत असून, त्यावर कोणाचे नियंत्रणच नाही, अशी परिस्थिती आहे. इमारतींवरून केबल टाकण्याबाबत सुरक्षेच्या दृष्टीने कोणतेही नियम नसल्याने परिस्थिती कठीण झाली आहे. घरोघरी टीव्ही केबल व त्यामार्फत इंटरनेट सेवा घेतली




जाते. त्यासाठी स्थानिक केबल ऑपरेटरमार्फत प्रत्येक इमारतीत जाड वायरी टाकल्या जातात. गच्चीवर आलेल्या वायरी तेथील मेन युनिटमध्ये जाऊन तेथून घरोघरी पोहोचवल्या जातात. इमारतींच्या आतमध्ये त्या व्यवस्थित कडेकडेने खिळ्याने अडकवून घरापर्यंत नेल्या जातात; परंतु इमारतींमध्ये येईपर्यंत त्यांचा प्रवास अक्षरशः बेकायदा व कोणाच्याही नियंत्रणाशिवाय होतो. परिणामी शहर विद्रूप होतेच; पण अपघाताचा धोकाही असतो. जमिनीखालून टाकल्या जाणाऱ्या केबल, वायरिंग, जलवाहिन्या वा गॅसवाहिन्यांवर महापालिकेचे कठोर नियंत्रण असते. त्यासाठी महापालिकेची परवानगी घेणे, त्यांचे शुल्क देणे, तपासणी आदी सोपस्कार पार पाडावे लागतात. त्याचमुळे भूमिगत वायरिंग साधारणपणे सुरक्षित असते. किंबहुना टॉवरवरून किंवा खांबांवरून जाणाऱ्या वीजवाहिन्यांसाठीही काटेकोर नियम व निर्बंध असतात. हे शुल्क व सारा उपद्व्याप वाचविण्यासाठी स्थानिक केबल ऑपरेटर भूमिगत केबल न टाकता हवेतून वाटेल तशा वायरी फिरवतात. काही केबल तर रस्त्यांवरून जेमतेम दहा फूट उंचीवरूनही गेलेल्या असतात. त्यामुळे मोठे अपघातही होऊ शकतात.



“ इमारतीमधील रहिवाशांना दमदाटी करून केबल वायर टाकले जातात. सोसायटचे टेरेस प्रायव्हेट प्रॉपर्टी असून, त्यांच्यावर हे व्यावसायिक मुजोरी दाखवतात. रस्त्याच्या बाजूने जाताना वर आकाशात पाहिल्यावर इमारतीवर जाळे दिसून येतात. छोटे-मोठे अपघात घडतात. बेकायदा केबल वायरिंगसाठी नियमावली करणे आवश्यक आहे. याबाबत महापालिका आयुक्तांना निवेदन दिले होते. त्यावर कारावाई करू असे सांगितले मात्र अद्याप कुठलीच कारवाई झालेली दिसत नाही.

–निखील काळकुटे, सामाजिक कार्यकर्ते



“ चिखली परिसरात आमची सोसायटी असून, इमारतीवर बेकायदा इमारतीचे जाळे तयार होऊ नये यासाठी सोसायटीतील सर्व सदस्यांनी एकी करून एकाच कंपनीला काम दिले. त्यामुळे बेकायदा केबलचे जाळे तयार होऊ दिले नाही. स्थानिकच्या व्यावसायिकांनी परस्पर केबल टाकले होते. मात्र आम्ही तीव्र विरोध करून, केबल काढण्यास भाग पाडले. महापालिकेने यावर नियमावली करणे आवश्यक आहे.

–विलास देशमुख पार्श्व, सोसायटी चेअरमन

# कै. मनीषा भोईर ट्रस्टच्या वतीने बचतगटांचा सत्कार

## कै. मनीषा भोईर ट्रस्टच्या वतीने महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
कै.मनीषा भोईर यांच्या १४ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त कै.मनीषा भाऊसाहेब भोईर ट्रस्टच्या वतीने पाच वर्षे व दहा वर्षे पूर्ण झालेल्या प्रेमलोक पार्क, इंदिरा नगर, बिजलीनगर, भोईर नगर आणि दळवीनगर मधील महिला बचतगटांचा सत्कार समारंभ शुक्रवारी (दि.१५) रोजी मनीषा स्मृती निवास, भोईर नगर चिंचवड येथे संपन्न झाला. यावेळी महिलांसाठी आरोग्य शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सौ. किरण हर्षवर्धन भोईर यांनी केले. यावेळी स्थानिक उल्लेखनीय कार्य महिला बचतगट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पिंपरी चिंचवड महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष कविता आल्हाट यांच्या हस्ते परिसरातील नविन महिला बचत गटांचे उदघाटन करण्यात आले. यावेळी कविता आल्हाट यांनी महिला बचत गटांनी व्यवसायात कसे उतरावे व त्याचा प्रसार कसा करावा व त्याचा प्रसार कसा करावा याविषयी मार्गदर्शन केले. तसेच भविष्यात त्याची उपलब्धता कशी आहे हे सांगितले. कै. मनिषा भाऊसाहेब भोईर यांच्या आठवणींना उजाळा देताना माजी नगरसेविका वैशालीताई काळभोर म्हणाल्या, प्रभागातील महिलांच्या मदतीसाठी मनिषा भोईर नेहमी तत्पर असत, त्याप्रमाणे किरण भोईर या कार्यतत्पर असतात. त्यांच्याच पाऊलावर पाउल ठेऊन आज सौ. किरण भोईर खंबीरपणे या सर्व बचत गटांच्या मागे उभ्या आहेत. त्या वेळोवेळी महिलांसाठी आरोग्य शिबीर व इतर उप्रकम राबवीत असतात ज्यामधून महिलांना व्यवसायिक व आर्थिक समृद्धी मिळते. तसेच समाजात वावरतांना त्यांना योग्य दिशा मिळते. किरण भोईर यांनी बचत गट आणि त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रकाश टाकला. एक महिला स्वयंस्फूर्तीने महिला बचत गटामार्फत कितपत काम करू शकते याबाबत तसेच महिला बचत गटाने सतत कृतीशील रहावे असे प्रतिपादन केले. यावेळी महासंघाच्या वतीने प्रभागातील १० वर्षे पूर्ण केलेल्या कृतीशील महिला बचत गटांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

# पवना, इंद्रायणीच्या प्रदूषणमुक्तीसाठी 'वज्रमूठ'!

## पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना मोठी कसरत करावी लागत आहे

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

इंद्रायणी व पवना या नद्यांना प्रदूषणमुक्त करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात आवाज उठवला. सरकारतर्फे उत्तर देण्यात आले. जोडीला पर्यावरणप्रेमीही सातत्याने प्रदूषणाकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधत आहेत. त्याअंतर्गत इंद्रायणी परिक्रमा रविवारपासून (ता. १७) सुरू झाली आहे. बुधवारी (ता. २०) व गुरुवारी (ता. २१) पवनामाई जलदिंडी आयोजित केली आहे. नद्यांच्या संवर्धनाबरोबरच प्रदूषणमुक्तीसाठी सर्वस्तरांतून आवाज उठवला जात असताना आता प्रत्यक्ष कृतीची जोड देण्याची आवश्यकता आहे.

इंद्रायणी नदीला संत तुकाराम महाराज यांचे देहू आणि संत ज्ञानेश्वर माउली यांची आळंदी या तीर्थक्षेत्रांचे सानिध्य लाभले आहे. पवना नदीच्या काठावर चिंचवड येथे महासाधू मोरया गोसावी यांचे समाधीस्थान आहे. त्याच बाजूला त्यांनी स्थापन केलेला मंगलमूर्ती वाडा आहे. मात्र, आज दोन्ही नद्यांना प्रदूषणाचा विळखा आहे. घरगुती सांडपाण्यासह कंपन्यांमधील रसायनमिश्रित सांडपाणीही थेट नद्यांमध्ये मिसळत आहे. त्यामुळे दोन्ही नद्यांमधील ऑक्सिजनचे प्रमाण शून्य असून, त्या मरणासन्न अवस्थेत आहेत. आषाढी व कार्तिकी वारी असो वा संत तुकाराम महाराज यांचा बीज सोहळा लाखो भाविक देहू-आळंदीमध्ये येतात. वर्षभरही दोन्ही तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची गर्दी असते. भक्तिभावाने ही मंडळी इंद्रायणीत स्नान करून तीर्थ घेत असते. मात्र, नदीतील पाणी प्रदूषित असल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे इंद्रायणीसह पवना नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी भाविकांसह



पर्यावरणप्रेमी एकवटले आहेत. आमदार महेश लांडगे, अश्विनी जगताप, अण्णा बनसोडे, दिलीप मोहिते पाटील, सुनील शेळके, उमा खापरे यांनी विधिमंडळ अधिवेशनात लक्षवेधी मांडली होती. त्यावेळी आमदार लांडगे व जगताप यांनी नद्यांच्या प्रदूषणाबाबत आक्रमक भूमिका मांडली. त्यावर उत्तर देताना सरकारतर्फे उद्योगमंत्री तानाजी सावंत यांनी उपाययोजना करत असल्याबाबत सांगितले होते. नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी उगमापासून संगमापर्यंत २३ ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणार असून त्याची निविदा प्रक्रिया पुढील दीड-दोन महिन्यांत सुरू होईल, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे नद्या प्रदूषणमुक्त होतील, असा आशेचा किरण दिसत आहे. लोकप्रतिनिधींसह पर्यावरणप्रेमी शासन व प्रशासनाचे लक्ष नद्यांच्या प्रदूषणाकडे वेधत आहेत. चिंचवड येथील प्रशांत राऊळ यांनी नागपूर येथे जाऊन विधानभवन परिसरात अनोखे आंदोलन करत लक्ष वेधले. राघव परिक्रमा आयोजित आळंदीतून अकरा डिसेंबरला निघालेली इंद्रायणीनदी माता पायी प्रदक्षिणा परिक्रमा उगमस्थानापासून निघून लोणावळा-कार्लामार्गे पायी प्रवास करत रविवारी नाणे येथे मुक्कामी पोहोचली. या परिक्रमेची सांगता २३ डिसेंबरला आळंदीत होईल, अशी माहिती आयोजक माधव आहेर यांनी सांगितले.

पवनामाई जलदिंडी बुधवारपासून पवना नदी संवर्धनासाठी व प्रदूषणमुक्तीसाठी जलदिंडी प्रतिष्ठानतर्फे बुधवारपासून (ता. २०) पवनामाई जलदिंडी काढली जाणार आहे. निगडीतील भक्तीशक्ती उद्यानापासून बुधवारी सकाळी साडेदहा वाजता दिंडीचे प्रस्थान होईल. तत्पूर्वी सकाळी नऊ वाजता लोहगड बोटक्लब येथे पवना धरणाची माहिती घेतली जाईल. पवनानगर येथे नदी पूजन करून दिंडीला प्रारंभ होईल. सकाळी साडेअकरा : शिवली घाट, दुपारी बारा : आर्डव घाट, दुपारी एक : थुगाव घाटावर आगमन, जलपूजन, ग्रामस्थ व शाळा भेट होईल. दुपारी दीड : शिवणेगाव, दुपारी अडीच : शिवणे घाट, जलपूजन, ग्रामस्थ व शाळा भेट, दुपारी चार : बेबडओहोळ किंवा सोमाटणे घाट, जलपूजन, ग्रामस्थ भेट; सायंकाळी पाच : साळुंब्रे घाट. गुरुवारी (ता. २१) सकाळी नऊ : साळुंब्रे ग्रामप्रबोधिनीमध्ये सभा, जलदिंडी आढावा; सकाळी ११ : साळुंब्रे घाट येथून दिंडी मार्गस्थ; सकाळी साडेअकरा : किवळे घाट, दुपारी बारा : रावेत घाट; दुपारी अडीच : थेरगाव घाट. दुपारी चार : चिंचवड येथील मोरया गोसावी समाधी स्थळ; सायंकाळी पाच : जलमैत्री व पर्यावरण पुरस्कार वितरण आणि दिंडीचा समारोप.

# चाळीशी नंतर शरीराचेच नव्हे तर मानसिक आरोग्य महत्त्वाचे

## डॉ.श्रीपाल सबनीस यांचे मत

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

भारत हा तरुणांचा देश आहे तसाच तो वयस्करांचाहीदेश आहे, सेवानिवृत्तांनी त्यांचे वय वाढले म्हणून नाराज होऊ नये कारण सर्वांचेच वय वाढणार आहे. वयाच्या चाळीसीनंतर केवळ शरीराचेच नव्हे तर मानसिक आरोग्य देखील महत्वाचे आहे. यासाठी सेवानिवृत्तांनी नियमित आसने, योगा यासारखा व्यायाम करावा, भजन कीर्तन सोबत संगीताचा आस्वाद घेत मनमोकळे जीवन जगावे आणि पुढील प्रवास सुखकर करावे, असे मार्गदर्शन ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज सेवा निवृत्ती धारक दिन अर्थात पेन्शनर्स डे साजरा करण्यात आला होता. चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सबनीस हे सेवानिवृत्तांचे आयुष्य या विषयावर मार्गदर्शन करत होते. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उप आयुक्त मनोज लोणकर, प्रभारी जनता संपर्क



अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, पिंपरी चिंचवड सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष प्रकाश जवळकर, महापालिका कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष शिवाजीराव तापकीर, महापालिका प्राथमिक शिक्षक संघटनेचे चंद्रकांत झगडे, महानगरपालिका प्राथमिक माध्यमिक शिक्षक संघटनेचे प्रल्हाद गिरी गोसावी, सुभाष मंत्री, केंद्र सरकार नारायण सोनार, राज्य शासकीय संघटनेचे श्रीराम मोने, जिल्हा परिषद निवृत्त संघटनेचे दिपक रांगणेकर, महिला संघटना प्रतिनिधी मंगला नायडू, प्राथमिक मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष श्रीराम परबत गुरुजी, पदाधिकारी गणेश विपट, डी.डी. फुगे, आर.डी.गायकवाड,ए. पी.भावसार, कालिंदी डांगे, विजया जीवतोडे, कुमुदिनी घोडके ,शैलजा कुलकर्णी आदी उपस्थित होत्या.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आपापली मते व्यक्त केली त्यामध्ये महापालिका सेवानिवृत्त कर्मचारी महासंघ, प्राथमिक शिक्षक संघटना, माध्यमिक शिक्षक संघटना, राज्य सरकारी कर्मचारी संघटना, केंद्र सरकारी कर्मचारी संघटना, पोस्ट खाते संघटना, रेल्वे कर्मचारी संघटना आणि विमा कर्मचाऱ्यांची आदी संघटनांचा समावेश होता. पिंपरी चिंचवड सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष प्रकाश जवळकर यांनी केलेल्या प्रास्ताविकामध्ये विविध प्रश्न सादर केले, त्यामध्ये महापालिका सेवानिवृत्त कर्मचा-यांना निवृत्ती नंतरची निवृत्ती वेतन रक्कम,भविष्य निर्वाह निधीची रक्कम, अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम मिळण्यासाठी लागणारा प्रदीर्घ कालावधी,अडचणी याबाबत खंत व्यक्त केली.वयाच्या सत्तरीनंतर धन्वंतरी योजनेचा उपयोग, सेवानिवृत्त कर्मचा-यांसाठी मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये वाहन लावण्यासाठी पार्किंगची सोय,सेवानिवृत्त कर्मचा-यांसाठी स्वतंत्र कक्ष याबाबत कार्यवाही करण्यासंबंधी विनंती केली.

# शिक्षक भरती उमेदवारांना दिलासा

## शिक्षण आयुक्तांनी दिला महत्त्वाचा आदेश

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यातील शिक्षक भरतीकडे डोळे लावून बसलेल्या राज्यभरातील हजारो उमेदवारांना दिलासा देणारी बातमी आहे. शिक्षक भरती प्रक्रियेत पवित्र संकेतस्थळावर तत्काळ जाहिराती देण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिले आहेत. राज्यात शिक्षकांच्या तीस हजार भरती करण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यासाठी अभियोग्यता चाचणी घेऊन त्याचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. मात्र बिंदुनामावली तपासणी, शिक्षक समायोजन अशी तांत्रिक प्रक्रिया लांबली आहे. शिक्षक भरतीच्या जाहिराती पवित्र संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याची सुविधा ऑक्टोबरमध्येच उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र अद्याप जाहिराती प्रसिद्ध झालेल्या नसल्याने त्यासाठी उमेदवारांनी उपोषण, आंदोलनेही केली. या पार्श्वभूमीवर पवित्र संकेतस्थळावर जाहिरात देण्याबाबत शिक्षण आयुक्तांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना परिपत्रकाद्वारे निर्देश दिले. पवित्र संकेतस्थळावर जाहिरात देण्यासाठी रिक्त पदांचे सामाजिक आरक्षण, अध्यापनाचे गट, विषयनिहाय रिक्त पदांची माहिती संकेतस्थळावर नोंद करण्याची सुविधा प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनवर देण्यात आली आहे. त्यानंतर प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी नोंद केलेली माहितीची पडताळणी करून ती योग्य असल्यास बिंदुनामावली, विषयनिहाय रिक्त पदांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी लॉगिनद्वारे मान्य करायची आहे. त्यानंतर प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनवर जाहिरात तयार करणे (जनरेट ॲडव्हर्टाइजमेंट) यावर क्लिक केल्यावर जिल्हा परिषदेकडील शिक्षक रिक्त पदांची जाहिरात तयार होणार आहे. ही कार्यवाही करण्यासाठी आवश्यक आरक्षणनिहाय रिक्त पदे, गट,



विषयनिहाय रिक्त पदांच्या माहितीची पडताळणी करून जाहिरात देण्यासाठी तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिक्षक भरती विनाविलंब होण्यासाठी पवित्र संकेतस्थळावरील सूचनांनुसार तत्काळ जाहिरातदेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील शिक्षक भरतीकडे डोळे लावून बसलेल्या राज्यभरातील हजारो उमेदवारांना दिलासा देणारी बातमी आहे. शिक्षक भरती प्रक्रियेत पवित्र संकेतस्थळावर तत्काळ जाहिराती देण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिले आहेत. राज्यात शिक्षकांच्या तीस हजार भरती करण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यासाठी अभियोग्यता चाचणी घेऊन त्याचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. मात्र बिंदुनामावली तपासणी, शिक्षक समायोजन अशी तांत्रिक प्रक्रिया लांबली आहे. शिक्षक भरतीच्या जाहिराती पवित्र संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याची सुविधा ऑक्टोबरमध्येच उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र अद्याप जाहिराती प्रसिद्ध झालेल्या नसल्याने त्यासाठी उमेदवारांनी उपोषण, आंदोलनेही केली. शिक्षक भरतीच्या जाहिराती पवित्र संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याची सुविधा ऑक्टोबरमध्येच उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र अद्याप जाहिराती प्रसिद्ध झालेल्या नसल्याने त्यासाठी उमेदवारांनी उपोषण, आंदोलनेही केली. या पार्श्वभूमीवर पवित्र संकेतस्थळावर जाहिरात देण्याबाबत शिक्षण आयुक्तांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना परिपत्रकाद्वारे निर्देश दिले. पवित्र संकेतस्थळावर जाहिरात देण्यासाठी रिक्त पदांचे सामाजिक आरक्षण, अध्यापनाचे गट, विषयनिहाय रिक्त पदांची माहिती संकेतस्थळावर नोंद करण्याची सुविधा प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनवर देण्यात आली आहे.

### दिलासा देणारी बातमी

**» प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनवर जाहिरात तयार करणे (जनरेट ॲडव्हर्टाइजमेंट) यावर क्लिक केल्यावर जिल्हा परिषदेकडील शिक्षक रिक्त पदांची जाहिरात तयार होणार आहे. ही कार्यवाही करण्यासाठी आवश्यक आरक्षणनिहाय रिक्त पदे, गट, विषयनिहाय रिक्त पदांच्या माहितीची पडताळणी करून जाहिरात देण्यासाठी तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिक्षक भरती विनाविलंब होण्यासाठी पवित्र संकेतस्थळावरील सूचनांनुसार तत्काळ जाहिरातदेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.राज्यातील शिक्षक भरतीकडे डोळे लावून बसलेल्या राज्यभरातील हजारो उमेदवारांना दिलासा देणारी बातमी आहे. शिक्षक भरती प्रक्रियेत पवित्र संकेतस्थळावर तत्काळ जाहिराती देण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिले आहेत.**

# तळवडे घटनेत आत्तापर्यंत १४ जणांचा मृत्यू

## आरोपी शरद सुतारला पोलिसांनी घेतलं ताब्यात

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड शहरातील तळवडे या ठिकाणी स्पार्कल कॅण्डलच्या कारखान्याला भीषण आग लागून जागीच सहा महिला कामगारांचा मृत्यू झाला होता. इतर गंभीर जखमी कामगारांना पुण्यातील ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. ससून रुग्णालयात उपचार घेत असलेल्या उषा पाडवी (वय-४०) यांचे आज सकाळी पावणेदहाच्या सुमारास निधन झालं. तळवडे आगीच्या घटनेतील मृतांचा आकडा आता १४ वर पोहोचला आहे. घटनेमध्ये गंभीर जखमी असलेल्या शरद सुतारला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून पोलिसांनी ताब्यात घेतल आहे. शरद सुतार हा शिवराज एन्टरप्रायजेस कंपनीचा मालक आहे. त्याच ठिकाणी स्पार्कल कँडल बनवल्या जात होत्या. जखमींना ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले



होते. त्यातील प्रतीक्षा तोरणे, कविता राठोड, शिल्पा राठोड, प्रियंका यादव, अपेक्षा तोरणे, कमल चौरे, सुमन गोधडे आणि आज उषा पाडवी यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेतील मृतांचा आकडा आता १४ वर पोहोचला आहे. दरम्यान, नातेवाईकांच्या विनंतीनंतर घटनेतील जखमी रेणुका ताथोड यांना ससून रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून त्यांना पुढील उपचारासाठी नातेवाईकांनी अमरावती या ठिकाणी नेले आहे. घटनेतील गुन्हा दाखल असलेला जखमी शरद सुतार याला देखील ससून रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला असून त्याला पोलिसांनी ताब्यात घेतल आहे.पिंपरी-चिंचवड शहरातील तळवडे या ठिकाणी स्पार्कल कॅण्डलच्या कारखान्याला भीषण आग लागून जागीच सहा महिला कामगारांचा मृत्यू झाला होता. इतर गंभीर जखमी कामगारांना पुण्यातील ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. ससून रुग्णालयात उपचार घेत असलेल्या उषा पाडवी (वय-४०) यांचे आज सकाळी पावणेदहाच्या सुमारास निधन झालं. तळवडे आगीच्या घटनेतील मृतांचा आकडा आता १४ वर पोहोचला आहे. घटनेमध्ये गंभीर जखमी असलेल्या शरद सुतारला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून पोलिसांनी ताब्यात घेतल आहे.

# स्पर्धा परीक्षेत यश मिळवून देण्यासाठी तरुणाला पाय धुतलेले पाणी प्यायला दिले!

## फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांनी दोन महिलांसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** नैराश्य दूर करून स्पर्धा परीक्षेत यश मिळवून देण्यासाठी एका तरुणाला पाय धुतलेले पाणी प्यायला देऊन भोंदूगिरीचा प्रकार महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) कार्यकर्त्यांनी उघडकीस आला. तरुणाची दीड लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी चतु:शृंगी पोलिसांनी दोन महिलांसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी वृषाली संतोष ढोले-शिरसाट (वय ३९, रा. वंशज गार्डन, पाषाण), माया राहुल गजभिये (वय ४५, रा. विठ्ठलनगर, पाषाण), सतीश चंद्रशेखर वर्मा (वय ३३, रा. गणेश हॉस्टेल, पाटीलनगर, बावधन) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका तरुणाने चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद




दिली आहे. आरोपींविरुद्ध जादूटोणा कायदा कलम, तसेच फसवणूक, धमकाविल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाषाण भागात एक महिला आणि तिचे साथीदार भोंदूगिरी करत असल्याची माहिती अंनिसचे कार्यकर्ते विशाल विमल यांना मिळाली होती. त्यानंतर विशाल आणि कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची शहानिशा केली. अंनिसचे कार्यकर्ते पोलिसांसह पाषाण परिसरात गेले. आरोपी वृषाली आणि साथीदारांनी गुरुदत्त कन्सल्टन्सी ही संस्था सुरू केली होती. त्यांनी कार्यकर्त्यांना एक हजार रुपये भरण्यास सांगितले. कार्यकर्ते विशाल कार्यालयातील एका खोलीत गेले. वृषालीने त्यांच्या हातात गंडा बांधून राख खाण्यास दिली. वृषाली फसवणूक करत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलीस खोलीत गेले. पोलिसांनी पंचनामा करून जादूटोण्याचे साहित्य जप्त केले. स्पर्धा परीक्षेत अपयश आल्याने एक तरुण नैराश्यात होता. समाज माध्यमातील जाहिरात पाहून तरुण तेथे गेला होता. दैवी शक्ती असल्याची बतावणी करून आरोपी वृषाली आणि साथीदारांनी तरुणीकडून वेळोवेळी दीड लाख रुपये उकळले. वृषालीने पाय धुतलेले पाणी तरुणाला प्यायला दिले. तिने तरुणाचे मित्र आणि नातेवाइकांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. चतु:शृंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी पांढरे, गुन्हे शाखेचे निरीक्षक जगन्नाथ जानकर, सहायक निरीक्षक संभाजी गुरव, उपनिरीक्षक विद्या पवार आणि पथकाने कारवाई केली.नैराश्य दूर करून स्पर्धा परीक्षेत यश मिळवून देण्यासाठी एका तरुणाला पाय धुतलेले पाणी प्यायला देऊन भोंदूगिरीचा प्रकार महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) कार्यकर्त्यांनी उघडकीस आला. तरुणाची दीड लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी चतु:शृंगी पोलिसांनी दोन महिलांसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी वृषाली संतोष ढोले-शिरसाट (वय ३९, रा. वंशज गार्डन, पाषाण), माया राहुल गजभिये (वय ४५, रा. विठ्ठलनगर, पाषाण), सतीश चंद्रशेखर वर्मा (वय ३३, रा. गणेश हॉस्टेल, पाटीलनगर, बावधन) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका तरुणाने चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### जादूटोण्याचे साहित्य केले जप्त

» वृषालीने त्यांच्या हातात गंडा बांधून राख खाण्यास दिली. वृषाली फसवणूक करत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलीस खोलीत गेले. पोलिसांनी पंचनामा करून जादूटोण्याचे साहित्य जप्त केले. स्पर्धा परीक्षेत अपयश आल्याने एक तरुण नैराश्यात होता. समाजमाध्यमातील जाहिरात पाहून तरुण तेथे गेला होता. दैवी शक्ती असल्याची बतावणी करून आरोपी वृषाली आणि साथीदारांनी तरुणीकडून वेळोवेळी दीड लाख रुपये उकळले. वृषालीने पाय धुतलेले पाणी तरुणाला प्यायला दिले. तिने तरुणाचे मित्र आणि नातेवाइकांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.

# तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही: शरद पवार

## शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त बैलगाडा शर्यतीचे आयोजन

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** सत्ताधाऱ्यांना बळीराजाबद्दल प्रेम नाही. कांदा प्रश्न असेल, साखर निर्यात बंदी असेल, या ना त्या निमित्ताने बळीराजा संकटात कसा जाईल, हे पाहणारे आजचे राज्यकर्ते असल्याचा आरोप करत या नाकर्त्या सरकारविरोधात एकजुटीची शक्ती उभी करून महाराष्ट्राचे चित्र बदलल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार राष्ट्रवादी काँगेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला. 'मी सेवेकरी सोशल फाउंडेशन'च्यावतीने शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त केळगाव येथे 'साहेब केसरी' बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले होते. या बैलगाडा शर्यतीच्या अंतीम लढती पाहण्यासाठी रविवारी पवार यांनी हजेरी लावली. खासदार अमोल कोल्हे, माजी आमदार विलास लांडे, फाऊंडेशनचे अध्यक्ष सुधीर मुंगसे, सोमनाथ मुंगसे यावेळी उपस्थित होते. आतापर्यंत आपण वाहिनीवरच बैलगाडा स्पर्धा पाहत होतो. मात्र, प्रत्यक्ष ही स्पर्धा पाहिल्याशिवाय डोळ्याचे पारणे फिटत नाही, याचे प्रत्यंतर आले. बैलगाडा स्पर्धा वेगवान स्पर्धा आहे. गुरा-ढोरांप्रती जिव्हाळा असलेल्या बळीराजाच्या निष्ठेची ही स्पर्धा आहे. देशपातळीवर काही धोरणात्मक निर्णय घेतल्यास जगात अन्य प्रकारच्या ज्या स्पर्धा होतात, त्या स्पर्धांमध्ये बैलगाडा स्पर्धेचे नाव नोंद झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. इंदापूर, जुन्नर, आंबेगाव, खेडसह आजुबाजूच्या तालुक्यात धरणे बांधली. उद्योगधंदे वाढवले. पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्राचा चेहरा कसा उजळेल याची काळजी घेतली. त्याचा परिणाम आज जिल्ह्याचे चित्र बदलले आहे. मात्र, आज आपण वेगळ्या संकटातून जात आहोत. एका बाजूने शेतक-याला निसर्गाशी लढा देत आपली शेती सांभाळावी लागत आहे. पण, दुसरीकडे ज्याच्या हातात देशाची सत्ता आहे, त्यांना बळीराजाबद्दल प्रेम नाही. जिल्ह्यात खेड तालुक्यात सर्वात जास्त कांदा पिकतो. मात्र, कष्टाने पिकवलेल्या या कांद्याला चांगली किंमत देण्याची ज्यांची जबाबदारी आहे, ते याकडे ढुंकूनही बघायला तयार नाहीत. उलट विविध कर बसवले, निर्यात बंदी केली. ज्यांना ख-या अर्थाने मदत केली पाहिजे, ती मदत करायची सोडून त्यांच्यासमोर संकटे वाढवली जात आहेत, असा आरोपही त्यांनी केला.